पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ६० दिनांक २०/१०/२०२२

# ०५ वर्षाच्या अपहरीत मुलीचा ०२ तासाचे आत शोध घेण्यास पालघर पोलीसांना यश

दिनांक १९/१०/२०२२ रोजी सायंकाळी १८:३० वाजेच्या सुमारांस, फिर्यादी नामे पुजा बापु जगताप वय-२७ वर्ष यांनी त्यांची अपहरीत मुलगी वय वर्षे ०५, रा. वर्धमान सोसायटी, रुम नं. १०२, फेज/२, कमलापार्क, माहिम रोड, पालघर हिस त्यांचे बिल्डींगचे शेजारी फेज/१, रुम नं. १०२ मध्ये राहणारा आरोपी वय वर्षे-२५ याने चॉकलेट देण्याचे बहाण्याने घेवुन गेला असुन तो अजुन पावेतो परत आला नाही व मुलीचे वडीलांना फोन करुन एक लाख रुपयांची मागणी करीत आहे व ते न दिल्यास मुलीचे जिवाचे बरे वाईट करण्याची धमकी देत आहे. सदरबाबत फिर्यादीवरुन पालघर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ३२२/२०२२, भा.दं.वि.क. ३६३, ३६४ अ प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर व प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या आदेशान्वये श्रीमती निता पाडवी, उप विभागीय पोलीस अधिकारी पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. उमेश पाटील पोलीस निरीक्षक पालघर पोलीस ठाणे, श्री सतिश गवई, सहायक पोलीस निरीक्षक केळवा पोलीस ठाणे व श्री संदिप कहाळे, सहायक पोलीस निरीक्षक सफाळे पोलीस ठाणे असे वेगवेगळी पथके तयार करुन अपहरीत मुलीचा शोध सुरु केला. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत यांचे मोबाईल क्रमांक उपलब्ध करुन घेवुन सायबर सेल पालघर यांचे मार्फतीने त्याचे लोकेशन काढले असता ते उसर्णी, केळवा परिसरात दिसुन आल्याने आरोपी यास केळवा रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेवन अपहरीत मुलीची सुटका केली आहे. सदर अपहरीत मुलीस फिर्यादी श्री. पुजा बापु जगताप यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उप निरीक्षक श्रीमती सुप्रिया मांढरे, पालघर पोलीस ठाणे हया करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक,पालघर, श्रीमती निता पाडवी, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, श्री. उमेश पाटील पोलीस निरीक्षक पालघर पोलीस ठाणे, श्री सतिश गवई, सहायक पोलीस निरीक्षक केळवा पोलीस ठाणे, श्री संतोष जाधव, सहायक पोलीस निरीक्षक पालघर पोलीस ठाणे, श्री संदिप कहाळे, सहायक पोलीस निरीक्षक सफाळे पोलीस ठाणे, श्रीमती सुप्रिया मांढरे पोलीस उप निरीक्षक, पालघर पोलीस ठाणे तसेच पालघर, सफाळा व केळवा पोलीस ठाणेचे अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.